# राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

सूचना का अधिकार

पिनॅकल मॉल, चौथा मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ,

जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२.

**Website- www.sic.maharashtra.gov.in**

दुरध्वनी क्र. ०२५३-२२३२७६४ ई-मेल - sicnashik@gmail.com


माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार

क्र. रामाआ-नाशिक/तक्रार क्र. ५६०/२०२५/जळगाव.

| तक्रारदार | प्रतिवादी |
|---|---|
| | जन माहिती अधिकारी |
| श्री.भगवान जगन्नाथ सोनवणे,<br>रा.रुम नं.१००३, अंबड सातपुर लिंक रोड, विठ्ठल मंदिराजवळ, भोर टाऊनशिप, जाधव संकुल, जि.नाशिक | ग्रामसेवक,<br>ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव, जि.जळगाव |

सुनावणी दिनांक १८/०३/२०२६

तक्रारदार यांनी दि. २४/१०/२०२५ रोजीच्या अर्जान्वये, "दि.२५/०८/२०२५ चा माहिती अर्जासंदर्भात संबंधीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव, जि. जळगाव यांना सादर केलेले पोस्टाचे पाकीट जन माहिती अधिकारी यांनी स्वीकारले नाही. भारतीय पोस्ट नियमानुसार माहिती अधिकार स्पष्ट पाकिटावर लिहिल्यानंतर ते पाकीट देण्याची जबाबदारी संबंधित पोस्टमनची व स्वीकारण्याची श्री. संदेश पंजाबराव निकम ग्रामसेवक मु.पो. कुंझर यांची असते. असे असताना पाकीट नाकारून त्यांनी जन माहिती अधिकारी अधिनियम २००५ चा भंग केलेला असून त्याचप्रमाणे कायद्याचा, घटनेचा, राज्यपाल, राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली, चीफ सेक्रेटरी व राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक यांचा अवमान केला आहे. तरी याबाबत संबंधितास आपल्याकडून योग्य ती कारवाई करून त्यांचा उलट अहवाल मला तक्रारदाराला जिल्हा सत्र न्यायालय नाशिक कोर्ट कामकाजासाठी प्राप्त करून द्यावा. अर्ज दाखल केल्यापासून ३० दिवसाच्या विहित मुदतीत माहिती न देणाऱ्या जन माहिती अधिकारी यांच्यावर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार दंड व कलम २० (२) नुसार शास्तीची कारवाई करावी. सोबतच मला झालेला आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रासा पोटी मला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(८) (ख) नुसार रुपये ५००००/- (पन्नास हजार हजार रुपये) नुकसान भरपाई देण्यात यावी. सोबतच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (२) आणि ७ (८) चे उल्लंघन केल्याप्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १६६ ए (लोकसेवक यांनी बेईमानी पूर्वक कार्य करणे) कलम १८८ (शासकीय व वैध आदेशाची अवहेलना करणे) नुसार एफ आय आर दाखल करून फौजदारी कारवाई करणे संबंधित त्याच्या प्राधिकरणाकडे शिफारिश करावी. सोबतच माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ७ (२) आणि ७ (८) चे उल्लंघन केल्याप्रकरणी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यावर भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १६६ ए (लोकसेवक यांनी बेईमानी पूर्वक कार्य करणे) कलम १८८ (शासकीय व वैध आदेशाची अवहेलना करणे) नुसार एफ आय आर दाखल करून फौजदारी कारवाई करणे संबंधित त्याच्या प्राधिकरणाकडे शिफारिश करावी. दि.२०/१०/२०२५ रोजी दाखल केलेले कलम १८ (१) (ख) व च अन्वये दाखल केलेल्या प्रस्तुत तक्रारीवर

तात्काळ सुनावणी घेण्यात यावी. मात्र तक्रारदार श्री. भगवान जगन्नाथ सोनवणे यांनी दि ११/१२/२०२४ निकाल दि.११/६/२०२५ रोजी पारित आदेशाची अंमलबजावणी न झाल्यानंतर सुद्धा पुन्हा माहिती अधिकाराचा वापर करून व तो अर्ज त्यांनी स्वीकारला नाही. कारण त्यांनी सांगितले की, आम्हाला कोणीही काहीही करू शकत नाही. व याबाबत अर्थपूर्ण व्यवहार केलेला आहे. जनतेच्या निवेदने अर्जाच्या निपटा याबाबत अधिकारी / कर्मचारी हेतू पुरस्कर दुर्लक्ष करीत असेल अगर निर्णय घेण्यास टाळाटाळ करीत असेल तर अशा अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुद्ध नियमानुसार शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. याद्वारे आपल्या निर्देशनास आणून देण्यात येते की तक्रार दाखल करण्याच्या कालमयदि संदर्भातील मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्याकडील परिपत्रक क्र. सकीर्ण २०१८/प्र. क्र. १६४/०१ दि.१०/१०/२०१३ व दि.११/२/२०१४ तसेच परिपत्रक क्र. मुमाआ २०१५/प्र. क्र. १०९/०२ दि.४/९/२०१५ मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडील रिट याचिका क्र. ६०१८/२०१८ दि- ३०/७/२०१९ नुसार च्या आदेशानुसार रद्दबात झालेले आहेत. त्यामुळे सदरचा परिपत्रकानुसार प्रस्तुत तक्रार अग्राह्य धरता येणार नाही याची कृपया आपण नोंद घ्यावी." असे तक्रारदार यांनी नमूद करुन माहितीचा अधिकार अधिनियमांतील कलम १८ (१) अंतर्गत आयोगाकडे तक्रार दाखल केली आहे.

२) सदर तक्रार अर्जाच्या अनुषंगाने दि. १८/०३/२०२६ रोजी आयोगासमोर आयोजित सुनावणीवेळी उभय पक्षकार अनुपस्थित होते.

३) तक्रारदार यांनी त्यांच्या दि. २५/०८/२०२५ रोजीच्या मुळ माहिती अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे दि.०९/१२/२०२२ ते २५/०८/२०२५ या कालावधीतील खालील प्रमाणे माहिती मागितलेली आहे.

*"१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १८(१) (C) नुसार अंतर्गत दाखल तक्रार संदर्भ श्री. भगवान जगन्नाथ सोनवणे यांचा दि-२/७/२०२५ रोजीचा तक्रार अर्ज. विशेष लक्षवेध संदर्भ संयोगिता पाटील राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक यांच्याकडील पत्र क्र- रामाआ नाशिक /द्वितीय अपिल क्र- ४०७६/२०२३/ जळगाव / तक्रार क्र - ३०९/२०२५/५८०७ दि २४/७/२०२५ यांची संपूर्ण माहिती साक्षांकित करून उपलब्ध करून देण्यात यावी व पृष्ठ संख्या नमूद करून व माहिती अधिकाराचा लोगो कलम २(च) नुसार साक्षांकित प्रती पुरवण्यात यावी. मा. न्यायालयीन कामकाजासाठी ४८ तासाच्या आत पुरवण्यात यावी. २) महोदय, उक्त संदर्भात विषयांकित पत्र / संदर्भ क्र १ व २ आपले लक्ष वेधावे. आपण संदर्भ क-२ अन्वये माहिती आयोगाची कागदपत्रे पुरावे याच्या निर्देशनास आणून जो अहवाल आपणास आदेश दि २४/७/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने आपणास कळविण्यात आले होते. त्या अहवालाच्या प्रती व पदावर रुजू असलेले ग्रामसेवक /कर्मचारी यांची माहिती साक्षांकित प्रती मला उपलब्ध करून देण्यात यावी. शासन नियमावलीची आर टी आय कलम २ (च) नुसार प्रमाणित प्रत मिळावी. याबाबत महत्त्वाचे आदेश In the high court of judicature at madras. The honourable Mr. Justice C. V. Karthikeyan W. P. No.- ३३४५४ of २०२४ महत्त्वाचे आदेश दि-२०/१२/२०२४ रोजी देण्यात आले आहे. ८ (१) "ज "त्र"ग" संबंधित माहिती रोखू शकत नाही. तरी जन माहिती अधिकारी यांनी नोंद घ्यावी. मा. न्यायालयीन कामकाजासाठी ४८ तासाच्या आत माहिती उपलब्ध करून दयावी. जर माहिती उपलब्ध न करून दिल्यास आपल्याविरुद्ध फौजदारी गुन्हा व दिवाणी गुन्हा दाखल होईल सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुढील कारवाई करण्यात येईल यांची नोंद घ्यावी. तरी हीच अंतिम नोटीस समजण्यात यावी. श्री. भगवान जगन्नाथ सोनवणे यांनी दि. २/७/२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठवलेले पाकीट श्री. संदेश पंजाबराव निकम ग्रामसेवक जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक मु. पो. कुंझर यांना दि.२/७/२०२५ RM७०७१९६३८५IN व दि. ७/७/२०२५ RM७०७१९६६६३IN रोजी पाठवलेले पाकीट श्री. संदेश पंजाबराव निकम ग्रामसेवक यांनी व आपण सदर पाकीट कोणाच्या दबावाखाली पाकीट स्वीकारले नाही त्याबाबतचा लेखी स्वरूपाचा खुलासा अर्जदाराला तात्काळ देण्यात यावा. जेणेकरून मला नाशिक कोर्टात सादर करता येईल, यांची आपण गंभीरपने नोंद घ्यावी व तात्काळ खुलासा देण्यात यावा. व या तीनही मुद्द्यावर माहिती देण्यात यावी पृष्ठ संख्या नमूद करून व आर टी आय लोगो लावून माहिती उपलब्ध करून देण्यात यावी."*

४) सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व प्रस्तूत नस्तीवरील उपलब्ध कागदपत्रे विचारात घेता, तक्रारदार यांच्या दि.२५/०८/२०२५ च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२५/८/२०२५ रोजी स्पीड पोस्टव्दारे पाठविण्यात आलेले पाकीट संबंधीत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव,जि.जळगाव यांनी नाकारले असल्याचे निदर्शनास येते. सदर पाकीटावर "Refused" असा शेरा मारुन दि.०३/०९/२०२५ सदरचे पाकीट परत पाठविल्याचे निदर्शनास येते.

तसेच, प्रत्यक्ष सुनावणीवेळी विद्यमान/तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित असून, सुनावणीपूर्वी त्यांनी कोणताही अहवाल आयोगास सादर केलेला नसल्याकारणाने प्रस्तूत प्रकरणाची वस्तूस्थिती आयोगाच्या निदर्शनास आलेली नाही. प्रस्तूत प्रकरणी पुरावादाखल तक्रारदार यांनी आयोगास स्पीड पोस्टाची पावती सादर केलेली आहे.

सबब, प्रस्तूत प्रकरणी आयोग पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, कुंझर, ता.चाळीसगाव,जि.जळगाव यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम (२०) (१) अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्तीनंतर १५ दिवसाच्या आत आयोगाकडे सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.
२. वरील निर्देशांसह प्रस्तूत तक्रार क्र. ५६०/२०२५/जळगाव निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

---

जा.क्र. 3980 04/04/2026.